महाराष्ट्र टाइम्स

www.facebook.com/matayuvadil पुणे ■ शनिवार, १३ एप्रिल २०१३ | २

# ई-कचऱ्याची विल्हेवाट 'स्वच्छ'तेच्या मार्गाने

चैत्राली चांदोरकर

मी.THE CHANGE

आजोबांच्या काळापासून चालत आलेली जुनी घड्याळे, रेडिओ, बॅटरी, जुन्या ट्युब, तुटलेले चार्जर अगदी बंद पडलेला कम्प्युटर... अशा अडगळ बनलेल्या 'ई' वस्तूंचे करायचे काय असा प्रश्न अलीकडे अनेकांना पडतो. काही जणं या वस्तूंना कचरापेटी दाखवतात, तर काही भंगार घेणाऱ्या व्यक्तीला देतात. शहराच्या कचरा समस्येत महत्त्वाच्या असलेल्या ई-कचऱ्याला योग्य मार्ग दाखविण्याचा विडा सध्या 'स्वच्छ' संस्थेने उचलला आहे. नागरिकांकडून कचरा घेऊन थेट रिसायकिंग प्लांटपर्यंत पोहोचविण्याचे काम ही संस्था स्वयंप्रेरणेने करते आहे.



स्वच्छ संस्थेला या ई-विल्हेवाट मोहिमेसाठी महापालिकेने कोथरूडच्या कचरा डेपोमध्ये जागा दिली आहे. विशेष म्हणजे शहराच्या विविध भागात घेतलेल्या छोट्या-छोट्या शिबिरांमधून संस्थेने अवघ्या पाच महिन्यात पाच टन 'ई-कचरा' गोळा केला आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे घरगुती वापरातील तसेच औद्योगिक स्तरावरील ई-कचऱ्याचे प्रमाण वेगाने वाढत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने ई-कचरा नियमावलीनुसार हा कचरा अधिकृत रिसायकलरकडे विल्हेवाट लावण्यासाठी देणे बंधनकारक केले आहे. मात्र, नागरिकांमध्ये याबाबत जागरूकता नसल्याने ते दररोजच्या कचऱ्यामध्येच ई-कचरा फेकतात. पर्यायाने प्रदूषणाला हातभार लागतो आहे. या पार्श्वभूमीवर 'स्वच्छ'ने शहराच्या विविध भागात कॅम्प घेऊन नागरिकांकडून ई-कचरा गोळा करण्यास सुरुवात केली आहे. गोळा झालेला कचरा कोथरूड येथील कचरा डेपोमध्ये आणून पुढील टप्प्यात नवी मुंबई येथील एका रिसायकलिंग कंपनीला पाठविला जातो. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रत्येक महिन्यात शहराच्या विविध भागात दोन शिबिरे आणि जनजागृतीपर व्याख्याने आयोजित केली जात आहेत, अशी माहिती संस्थेच्या मैत्रेयी शंकर यांनी दिली.

महापालिकेबरोबर संस्थेची चर्चा सुरू असून पुढील टप्प्यात कलेक्शन सेंटरची संख्या वाढविण्यात येणार आहे. ई-कचरा हा भंगार गोळा करणाऱ्या व्यक्तींसाठी उदरनिर्वाहाचे साधन आहे. सध्या या कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात वर्गीकरण आणि विल्हेवाट या व्यक्तींमुळेच होते आहे. भविष्यात ई-कचरा थेट कंपन्यांकडे गेला, तर यांच्या पोटावर पाय येणार आहे. त्यामुळे, एकूणच या प्रक्रियेत या समूहाला कशा पद्धतीने सहभागी करून घेता येईल, यासाठी स्वच्छतर्फे आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. लवकरच याचा ठोस पर्याय आम्ही महापालिकेला सादर करणार आहोत, असे मैत्रेयी शंकर यांनी सांगितले.